Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.712
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2604S01V14P012

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Apr'26
Issue–IV(I), Volume–XIV

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व शिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास

**उमेश श्रीरंग उबाळे**
विद्यार्थी ( एम ए इतिहास)
य. च. मु विद्यापीठ, नाशिक
केंद्र-एल आर टी कॉलेज, अकोला
मोबाईल न –७८२२८०६४२२
इमेल-umeshsubale@gmail.com

**सारांश**

आपण पाहतो शिक्षणासाठी भारत देशामध्ये अनेक समाज सुधारकांनी कार्य केले आहे. जसे महात्मा ज्योतिबा फुले, रवींद्रनाथ टागोर, पंजाबराव देशमुख यांनी भारत देशामध्ये शिक्षण प्रसारासाठी कार्य केले आहे. त्याच प्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. त्याकाळात शिक्षणाचा एवढा प्रसार झाला नव्हता. समाज मागासलेला होता. स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. स्त्रिया व मागास समाज हा शिक्षणापासून वंचित होता. समाजात त्यांची अवस्था खुपच वाईट होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना प्रगती पथावर आणण्यासाठी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. शिक्षणच समाजात जागुती व परिवर्तन घडवून आणू शकते या विषयी बाबासाहेबांची खात्री झाली होती. शिक्षणाने मानवत डोळसपणा येतो. चुकीच्या गोष्टी विषयी समजतात. व्यक्तीला प्रगती पथावर आणता येते. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना शिकण्याचे आव्हान केले. समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांनी लोकांच्या प्रबोधनासाठी अनेक दौरे काढले. आपल्या भाषणामधून त्यांनी लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एवढ्यावरच न थांबता त्यांनी समाज प्रबोधनासाठी वृतपत्र काढले. वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी समाजात प्रबोधन घडून आणण्यासाठी प्रयत्न केले. मागास समाजातील लोकांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही ही गोष्ट पटवून दिली. भारतीय संविधानात सुद्धा त्यांनी शिक्षणाविषयी तरतुदी केल्या. अशाप्रकारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण प्रसारासाठी अतिशय मोलाचे कार्य केले.

**बीज शब्द**

मागास समाजाचे शिक्षण, बहिष्कृत समाज, शिक्षण प्रसार, शिक्षण संस्था स्थापन, शिक्षणाचे महत्व, बहिष्कृत समाज, पीपल्स एज्युकेशन सोसायटी.

**प्रस्तावना**

आपण अभ्यास केल्यास असे दिसून येते की, शैक्षणिक कार्य अनेक समाजसुधारक आणि राष्ट्रीय नेत्यांनी केलेले आहे. जसे की मौलाना अबुल कलाम आझाद, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतीबा फुले अशी बरीचशी नावे आपल्याला दिसतील. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अतुलनीय असे आहे. अनेक वर्ष भारतीय समाज शैक्षणिक गुलामगिरीत खितपत पडलेला होता. कारण अस्पृश्य समाज व महिलांना प्रस्थापित व्यवस्थेने शिक्षणापासून वंचित ठेवलेले होते. शिक्षणाअभावी त्यांची प्रगती खुंटलेली होती. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व ओळखले. शिक्षणाशिवाय प्रगती करणे शक्य नाही. तळागाळातील मागास समाजाला जागे करून त्यांना प्रगती पथावर आणण्याचे महान कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. जे कार्य नभूतो नाभविष्यति असे आहे. भूतकाळात अस्पृश्य लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवेले गेलेले होते. त्यामुळे ते प्रगती पथापासून खूपच दूर होते. समाजात त्यांना हीन वागणूक दिली जात होती. प्राण्यापेक्षाही वाईट वागणूक त्यांनी दिली जात होती. महात्मा फुले यांनी शैक्षणिक कार्याची सुरवात केली. मुलीसाठी भारतातील पहिली शाळा त्यांनी सुरु केली. तेच शिक्षण समाजातील सर्व मागास जाती जमातीपर्यंत पाह्चाविण्याचे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले दिसून येते. शिक्षणामुळे स्वाभिमानाने जगता येते. माणूस हा आत्मनिर्भर बनतो. तो स्वत:ची प्रगती चांगल्याप्रकारे करतो. याची जाणीव डॉ बाबासाहेब आंबेडकराना शिक्षणामुळे झाली. त्यामुळे त्यांनी शिक्षणाला अतिशय महत्व दिले. अजूनही प्रगती होणे बाकी आहे. त्यांच्या कार्यामुळे भारत देश्यातील समाजात खूप मोठी जागृती झालेली दिसून येते. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास आपण करणे अगत्याचा आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी अनेक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रस्तुत संशोधन लिहिण्यासाठी निरीक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. सर्व प्रथम अनेक पुस्तकातून संशोधनासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव केलेली आहे. नंतर त्याचे सविस्तर वाचन करून त्यातील महत्वाच्या मुद्याचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी घेतल्या आहेत. ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा सुद्धा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केलेला आहे. यासाठी अनेक ऐतिहासिक पुस्तकाचे सखोल वाचन केले आहे. त्या पुस्तकाचे वाचन करून त्यातील महत्वाच्या बाबीच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. अनेक पुस्तकातून गोळा केलेल्या बाबीमधून महत्वाच्या बाबी वर्णन करून सविस्तर दिलेल्या आहेत. अशाप्रकारे या शोध निबंधासाठी अनेक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**उद्दिष्टे**

१) तत्कालीन समाजात शिक्षण घेण्यासाठी कोणत्या अडचणी होत्या याचा आभास करणे.
२) शिक्षण घेण्यामुळे कोणते फायदे होतात त्याचा अभ्यास करणे.
३) शिक्षण प्रसारासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणते कार्य केले त्याचा अभ्यास करणे.
४) डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण प्रसारासाठी कोणत्या शिक्षण संस्था स्थापन केल्या त्याचा अभ्यास करणे.
५) वर्तमान काळात शिक्षण प्रसारासाठी आवश्यक शिफारशी करणे.

**प्रारंभिक जीवन**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु, मध्यप्रदेश या ठिकाणी झाला. महु हे ठिकाण मध्यप्रदेशातील असून ते मिलिटरी कॅन्टोनमेन्ट होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे घरातील चौदावे अपत्य होते. तसेचे बाबासाहेब आंबेडकर हे रामजी सकपाळ यांच्या घरातील शेवटचे अपत्य होते. त्यांच्या वडिलाचे नाव रामजी मालोजी सकपाळ होते. तर आईचे नाव भीमाबाई होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी सकपाळ हे मिलिटरी मध्ये काम करत होते. मिलीटरीमध्ये ते सुभेदार या पदावर होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोबा मालोजी सकपाळ हे सेवानिवृत्त लष्करी शिपाई होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आई भीमाबाई ह्या मेजर सुभेदार धर्माजी मुरबाडकर यांची मुलगी होती. धर्माजी मुरबाडकर हे ठाणे जिल्ह्यातील मुरबाड या गावाचे होते. रामजी आणि भीमाबाई यांचा विवाह १८६५ मध्ये झाला. विवाहावेळी रामजी यांचे वय १८-२० वर्ष व भीमाबाई यांचे वय १३-१४ वर्ष होते. या दांपत्याला एकूण १४ अपत्य होती. त्यापैकी केवळ बाळाराम, गंगा, रमाबाई, आनंदराव, मंजुळा, तुळसा व भीमराव हिच जगली. बाकीची अपत्य लहानपणीच दगावली. बाबासाहेबांच्या लहानपणीच त्यांची आई भीमाबाई यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांच्या संगोपनाची काळजी रामजी याना लागली. त्यावेळी मुलांची आत्या मीराबाई यांनी मुलाची संगोपनाची जबाबदारी घेतली. त्यांचे मुळ गाव रत्नागिरी जिल्यातील अंबाडवे हे होते. अंबाडवे हे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आहे. त्यांचा जन्म हा अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीत झालेला होता. रामजी यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव अंबावडे असल्यामुळे त्यांचे मूळ आडनाव पाठीमागे पडून अंबावडेकर झाले.

**शालेय शिक्षण**

रामजी आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल अतिशय जागरूक होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव शाळेत दि ७ नोव्हेंबर १९०४ मध्ये घातले गेले. जेंव्हा त्यांचे नाव सातारा येथील शाळेत घातले गेले त्यावेळी त्यांचे गुरुजी आंबेडकर यांनी त्यांचे नाव उच्चारताना अवघड वाटते म्हणून आंबेडकर असे लिहिले. त्यामुळे त्यांचे आडनाव आंबेडकर असे कायमस्वरूपीच बदलेले गेले. भीमराव व आनंदराव त्यांनी सातारच्या शाळेत जाऊ लागले. त्यावेळी अस्पृश्यतेचे चटके त्यांना सहन करावे लागले. शाळेत असताना त्यांना शिक्षणाची आवड होती. रामजी यांना मुलांच्या शिक्षणाची काळजी होती. मुलांना अभ्यासाची चांगली सवय लागावी म्हणून ते सकाळच मुलाकडून संताची अभंगे म्हणून घेत असत. रामजी मुलांना रामायण व महाभारत यामधील कथा मुलांना सांगत त्याचे वाचन ते त्याचंकडून करून घेत असत. त्यामुळे लहानपणीच त्यांचेवर चांगले संस्कार झाले. रामजी सुभेदारानी मुलांना धार्मिक व नैतिकच शिक्षण दिले नाही तर त्यांच्या व्यावहारिक शिक्षणाची सुद्धा काळजी घेतली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शालेय शिक्षण सातारा, दापोली व मुंबई या ठिकाणी झाले.

मेट्रिक परीक्षेसाठी त्यांनी मुंबई येथील एल्फिन्स्टन हायस्कूल येथे एडमिशन घेतले. डॉ बाबासाहेब आंबेडकर १९०७ साली मेट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले. मेट्रिकच्या परीक्षेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ७५० पैकी२८२ गुण मिळाले होते. त्यांना मिळालेल्या या

यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान केशव सीताराम बोले यांनी स्वीकारले होते. या कार्यक्रमात कृष्णाजी अर्जुन केळुस्कर हे उपस्थित होते. सर्वांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कौतुक केले. त्यांचे वडील रामजी सकपाळ यांनी सर नारायणराव चंदावरकर यांच्या मदतीने बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची भेट घेतली. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्याकडून महिन्याला पंचवीस रुपये एवढी स्कौलरशिप मंजूर करून घेतली. अशाप्रकारे त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढील शिक्षणाची तजवीज केली. शालेय जीवनात त्यांना अतिशय कटू अनुभवांना सामोरे जावे लागले. शाळेत असताना सहाध्यायी मुलाकडून होणाऱ्या हेटाळणीला सुद्धा सामोरे जावे लागले. शालेय शिक्षण झाल्यानंतर त्यांनी

**उच्च शिक्षण**

पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये १९०८ मध्ये प्रवेश घेतला. कॉलेजच्या शिक्षणासाठी त्यांना पैशाची अडचण होती. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती खुपच बेताची होती. मेट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे गुरुजी कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांनी त्यांच्या राहत्या ठिकाणी मुंबईत सत्कार घेतला. त्यावेळी त्यांनी पुढील शिक्षण सोडू नये अशी सूचना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना केली. कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यानी बाबासाहेबांना गौतम बुद्धाच्या चरीत्राचे पुस्तक भेट स्वरूप दिले. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकरासाठी पुढील शिक्षणासाठी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचेकडे स्कॉलरशिपसाठी शिफारस केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एल्फिन्स्टन कॉलेज मधून १९१२ साली बी ए ची परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले. बी ए साठी त्यांनी अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेतले. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेला गेले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात त्यांनी उच्च शिक्षणासाठी त्यांनी प्रवेश घेतला. उच्च शिक्षणासाठी त्यांना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी आर्थिक मदत केली. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिवसातील अठरा तास अभ्यास  केला. त्यांनी आपला वेळ अभ्यासा व्यतिरिक्त अजिबात इतर बाबीमध्ये घातला नाही. कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम ए ची पदवी १९१५ मध्ये घेतली.

एम ए साठी त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर प्रबंध लिहिला. हा प्रबंध त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण लिहिला. त्यासाठी त्यांनी खूप महत्वपूर्ण संदर्भ दिले. त्यांचे वाचन केल्यास आपल्यास त्यांच्या अभ्यासाचा व्याप कळून येईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यापीठात१९१६ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ऐंड पोलिटीकल सायन्स या संस्थेत प्रवेश घेतला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१६ मध्ये ' नेशनल डीविडड ऑफ इंडिया: अ हिस्टोरिकल एण्ड अनलिटीकल स्टडी' हा प्रबंध सादर केला. हा प्रबंध त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात पीएचडी साठी सादर केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हा प्रबंध १९२५ साली 'ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' (१८३३-१९२१) या नावाने प्रकाशित केला. यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली अभ्यासपूर्ण चिकित्सक मते मांडली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मे १९१६ मध्ये 'काष्टस इन इंडिया' हा निबंध वाचला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणासाठी बडोदा सरकारशी एक करार केलेला होता. त्या करारानुसार बाबासाहेबांना बडोदा संस्थानात दहा वर्ष नोकरी करायचे ठरविले. त्या करारानुसार बाबासाहेबांनी बडोद्यामध्ये लष्करी सचिव म्हणून कार्यभार स्वीकारला. परंतु बडोदा संस्थानामध्ये त्यांना उच्चशिक्षित असूनही अस्पृश्यतेच्या त्रासाला सहन करावे +लागले. सहकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबई येथील सिडनेहम कॉलेज मध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक पदाची नोकरी स्वीकारली.  कॉलेजमध्ये त्यांनी मुलांना अत्यंत चांगल्या प्रकारे शिकविले. शिकविण्या अगोदर ते अभ्यास करून नोटस काढत असत. त्यामुळे विद्यार्थी अगदी तल्लीन होऊन त्यांचे क्लास अटेंड करत. याठिकाणी मिळालेल्या पैशांचा वापर त्यांनी खुपच काटकसरीने केला. त्यातील काही पैसे त्यांनी पुढील शिक्षणासाठी बचत केले. डॉ आंबेडकरबाबासाहेब आंबेडकरानी १९२१ मध्ये इंग्लंडच्या ग्रेज इन या संस्थेत बैरिस्टर इन लौ या पदवीसाठी प्रवेश घेतला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२१ मध्ये एम एस्सी पदवी मिळवली. एम एस्सी पदवीसाठी त्यांनी ' प्रोविन्शल डीसेन्ट्रलायजेशन ऑफ ईम्पीरियल फायनान्श इन ब्रिटीश इंडिया' या विषयावर प्रबंध लिहिला. यासाठी त्यांनी खडतर अभ्यास केला. जर्मनीतील बोन विद्यापीठात त्यांनी काही काळ अभ्यास केला. त्यावेळी त्यांनी विद्यापीठात प्रवेशासाठी जर्मन भाषेतून त्यांनी पत्र लिहिले. त्यासाठी त्यांनी उत्कृष्ट जर्मन भाषेचा वापर केलेला होता. त्यांना विविध भाषा अवगत तर होत्याच परंतु त्या भाषेतील ते विद्वान होते. हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले लेखन व भाषणातील वापरलेल्या शब्दावरून दिसून येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा

विद्याव्यासंग खुपच दांडगा होता. त्यांचा वाचनाचा आवाका खूपच मोठा प्रोब्लेमहोता. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डी एस् स्सी पदवी मिळाली. ही पदवी त्यांना लंडन स्कूल ऑफ एकोनोमिक्स या संस्थेकडून भेटली. डी एस स्सी पदवी घेणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे पहिले विद्यार्थी होते. डी एस स्सी पदवीसाठी त्यांनी 'प्रोब्लेम ऑफ रुपी-इट्स ओरिजिन एन्ड इट्स सोलुशन्स' या विषयावर त्यांनी आपला प्रबंध सादर केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना परदेशात प्रोफेसर सेलीग्मन, प्रोफेसर सिगर व इतर विद्वान यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अभ्यासाचे भरभरून कौतुक केले. अशा रीतीने त्यांनी अत्यंत खडतर व कठीण परिस्थित आपले शिक्षण घेतले. आपल्या शिक्षणाचा उपयोग त्यांनी समाजाच्या सेवेसाठी केला.

**शिक्षणाचे महत्व**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे व जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' असे ते शिक्षणाविषयी म्हणत. शिक्षणामुळे आपली आत्मिक उन्नती होते. शिक्षण माणसाला जागृत करते. शिक्षणामुळे आपल्याला आपल्या हक्काची जाणीव होते. शिक्षणामुळे आपला आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. त्यामुळे अस्पृश्य आणि मागास जातींना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणामुळे व्यक्ती मानसिक गुलामीतून बाहेर पडतो, जी येथील समाज व्यवस्थेने काही लोकांवर लादलेली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात १९२० मध्ये भरलेल्या माणगाव परिषदेतून केली. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव २० मार्च १९२० रोजी माणगाव परिषदेतून केला. त्यावेळी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपले मत बाबासाहेबाविषयी व्यक्त केले की, मागासवर्गीय जातींना आपला नेता सापडला आहे. भविष्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर एक राष्ट्रीय नेते होतील आणि मागासवर्गीय जातींचा उद्धार करतील. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी १९२० मध्ये केलेली भविष्यवाणी अगदी खरी ठरली. पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खरंच राष्ट्रीय पातळीवर आपल्या कार्याने ठसा उमटविला. तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांनी सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची दखल घेतली. अस्पृश्योधाराचे कार्यच नव्हे तर पूर्ण विकसीत भारताची पायाभरणी बाबासाहेबांनी केल्याचे आपणास दिसून येते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा या संस्थेची स्थापना केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना २० जुलै १९२४ रोजी केली. या संस्थेच्या माध्यमातूनत्यांनी लोकांचे प्रबोधन केले. तसेच मुलासाठी वसतिगृह, वाचनालय व रात्र शाळा सुरु केल्या. मागास मुलांचा शिक्षणाच्या माध्यमातून विकास व्हावा यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाचे महत्व चांगल्याप्रकारे जाणत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या भाषांनातून व लिखाणातून लोकांचे प्रबोधन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राथमिक शिक्षणाला तर महत्व दिले. त्याच बरोबर त्यांनी उच्च शिक्षणाला सुद्धा तितकेच महत्व दिले.

सायमन कमिशनची स्थापना सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सायमन कमिशन भारतात १९२८ मध्ये आले. त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्यावतीने मुंबई येथे निवेदन दिले. त्या निवेदनात त्यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी सरकारांनी मदत करावी. अस्पृश्यांसाठी नवीन शाळा, वसतिगृह यांची व्यवस्था करावी. तसेच अस्पृश्यासाठी सरकारी नोकरीत सरकारने त्यांना रोजगारासाठी संरक्षण द्यावे. असें निवेदन त्यांनी सरकारला केले. या बाबीची मागणी त्यांनी सायमन कमिशनला केली. त्यावेळी भारत देशावर ब्रिटीश लोकांचे राज्य होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर ब्रिटीश सरकारच्या मंत्रिमंडळात मजूर मंत्री होते. ते या पदावर जुलै १९४२ मध्ये काम पहिले. त्यावेळी त्यांनी मजुरांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. या पदावर असताना त्यांनी अस्पृश्याच्या शिक्षण प्रसारासाठी काम केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे मध्यवर्ती सरकारच्या नोकरींत प्रथम आठ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. कालांतराने त्यामध्ये सुधारणा करून त्या जागामध्ये वाढ केली. आता त्या जागांची संख्या १२ टक्के इतकी करण्यात आली.

अस्पृश्य समाजाची आर्थिक परीस्थिती चांगली नव्हती. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजच्या शिक्षणासाठी दूर अंतरावर शहरात जावे लागत होते. तिथे राहण्याची व जेवण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे त्यांच्या शिक्षणासाठी अडचणी निर्माण होत होत्या. हि बाब लक्ष्यात घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारणी सभे मार्फत सोलापूर या ठिकाणी पहिले वसतिगृह सुरु केले. जेणे करून त्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर होतील. हे वसतिगृह त्यांनी सोलापूर या ठिकाणी ४ जानेवारी १९२५ रोजी सुरु केले. या वसतिगृहातर्फे विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था पुरविली जात असे. त्यासोबत विद्यार्थ्यांना जेवण, शालेय गणवेश तसेच शाळेसाठी लागणारी पुस्तके व स्टेशनरी पुरविली जात असे. सोलापूर या ठिकाणी त्याकाळी नगरपालिका होती. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नाने सोलापूर नगरपालिकेकडून चाळीस हजार रुपयाचे अनुदान मंजूर करून ते वसतिगृहासाठी उपलब्ध करून

दिले. या वसतिगृहाचे नियोजन व व्यवस्थापन बहिष्कृत हितकारिणी सभा पाहत होती. व तसेच भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लिखाणातून व भाषणातून शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य व जनतेचे प्रबोधन केले. त्यामुळे महाराष्ट्रात ठाणे, जळगाव, पनवेल, संभाजीनगर या ठिकाणी वसतिगृह सुरु करण्यात आले. त्याचा फायदा मागास समाजातील मुलांना शिक्षणासाठी झाला. त्यामुळे वेगाने शिक्षणाचे कार्य झाले.

**वाचनालय व ग्रंथालय**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला अतिशय महत्व दिले. शिक्षणासाठी ग्रंथ व पुस्तकाची गरज असते. हे लक्ष्यात घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने ग्रंथालय व वाचनालय सुरु केले. वृत्तापत्रामुळे बातमी वेगाने पसरली जाते हि बाब त्यांनी ओळखली होती. त्यामुळे बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एक मोफत वाचनालय सुरु केले. त्याबरोबरच त्यांनी सरस्वती विलास नावाचे एक मासिक सुद्धा बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने लोकप्रबोधनासाठी सुरु केले. त्या आपले विचार लोकापर्यत जलद रीतीने पोहचविणे शक्य झाले.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर व्हाइसरायच्या कार्यकारी मंडळात होते. त्यावेळी त्यांनी वेळी त्यांनी शिक्षण प्रसारासाठी कार्य केले. तसेच पंडित नेहरू यांच्या मंत्रिमंडळात सुद्धा सदस्य होते. त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणासाठी खूप प्रयत्न केले. मागास समाजातील मुलात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यांची प्रगती व्हावी यासाठी  डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खूपच प्रयत्न केले. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना ८ जुलै १९४५ रोजी मुंबई या ठिकाणी केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या स्थापने मागे शिक्षणाचा प्रसार समाजात व्हावा हा होता. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वत: होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास घडून यावा हा उद्देश त्या पाठीमागे होता. उच्च शिक्षणाची व्यवस्था मुलासाठी व्हावी हा त्यामागे हेतू होता. उच्च शिक्षणाचा प्रसार समाजातील सर्व मध्ये व्हावा हा उद्देश होता. या संस्थेच्या तर्फे सामाजिक व शैक्षणिक कार्यास गती देणे. अशी प्रागतिक उद्दिष्टे पीपल्स एजुकेशन सोसायटीची होती.

**सिद्धार्थ महाविद्यालय**

पीपल्स एजुकेशनची स्थापना मुंबई या ठिकाणी केलेली होती. त्यामुळे डॉ बाबसाहेब आंबेडकर यानी संस्थेतर्फे वडाळा या ठिकाणी सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. सिद्धार्थ कॉलेजची स्थापना डॉ  बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जून १९४६ रोजी केली. सुरुवातीस हे महाविद्यालय चर्चगेट या ठिकाणी छावणीत भरत होते. त्यानंतर सिद्धार्थ महविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले. काही काळाने १९४९ रोजी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. अल्बर्ट इमारत आता आनंदभवन या नावाने ओळखली जाऊ लागली. मेनका इमारत ही जुनी इमारत होती. या इमारतीत जुनी जपानी बँक कार्यरत होती. दुसरे महायुद्ध १९३९ रोजी सुरु झाले. त्यावेळी या इमारतीवर ताबा मिळविण्यात आला होता. आरंभी सिद्धार्थ महाविद्यालयाची भरण्याची वेळ सकाळी ११:०० वाजता अशी होती. त्यावेळी पैश्या अभावी बरीच मुले कामासाठी जात असत. नंतर कॉलेज मध्ये येत असत. मुलांची अडचण ओळखुण महाविद्यालयाने त्यांना वेळेची थोडी मुभा दिली होती. सिद्धार्थ महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य लेफ्टनंट कर्नल ए बी गजेंद्रगडकर हे होते. प्राचार्य मिलिटरी मधील असल्याने कॉलेज मध्ये कडक शिस्तीचे वातावरण होते. प्राचार्य ए बी गजेन्द्रगडकर हे संस्कृतचे चांगले विद्वान व गाढे अभ्यासक होते. गुरुद्वारा समितीच्या श्री नानकाना समिती व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चर्चेतून व विचार विनिमयातून खालसा महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली होती. खालसा महाविद्यालय मुंबई या ठिकाणी १९३७ मध्ये सुरु केले होते. सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना झाली त्यावेळी शिकविण्यासाठी प्राध्यापक, इतर कर्मचारी वर्ग व प्रशासनाची कमतरता होती. त्यावेळी खालसा महाविद्यालयातील प्रशासन व्यवस्थेने खूपच मदत केली होती. विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची अडचण ओळखून त्या ठिकाणी सिद्धार्थ वसतिगृह सुरु करण्यात आले. हैदराबाद संस्थानचे निजाम मीर उस्मान अलीखान बहादूर यांनी पी ई सोसायटीस पाच लाख रुपयाची देणगी दिली. त्या रकमेचा वापर शैक्षणिक कामासाठी करण्यात आला. अशाप्रकारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्ञान दानाचे कार्य केलेले आ

**मिलिंद महाविद्यालय**

पीपल्स एजुकेशन सोसायटीच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संभाजीनगर या ठिकाणी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. संभाजीनगर परिसरात दूरवर महाविद्यालयीन व उच्च शिक्षणाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मध्यवर्ती ठिकाणाची निवड केली. मिलिंद महाविद्यालयाची स्थापना जून १९५० रोजी केली गेली. सुरुवातीस महाविद्यालयचे नांव पी

ई एस कॉलेज असे होते. मिनान्दर हा एक ग्रीक सम्राट होता. नागसेन या बौद्ध भिक्खुने वादविवादात सम्राट मिलिंद याला हरविले होते. त्यानंतर सम्राट मिलिंदाने बौध्द धर्माचा स्वीकार केलेला होता. दोघातील संवादावर आधारित 'मिलिंदपन्ह' नावाचा ग्रंथ आहे. त्यामध्ये अतिशय उत्कृष्ट अशी शिक्षकाचे चांगले गुण याविषयी माहिती दिलेली आहे. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध विद्वान मिलिंद यांच्या विद्वतेवरून महाविद्यालयाचे नाव मिलिंद महाविद्यालय असे ऑक्टोबर १९५५ रोजी करण्यात आले.

**समारोप**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणा संबधी अतिशय मोलाचे असे कार्य केलेले आहे. शिक्षणाचे कार्य इतिहासात त्यांच्या सारखे कोणी केल्याचे अजिबात दिसून येत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्याचा ठसा वेगवेगळया क्षेत्रात उमटविला आहे. विद्वातेच्या विविध क्षेत्रात त्यांचा हातखंडा होता. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून शिकण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. मानवी विकासात त्यांनी अतिशय उत्तुंग असे कार्य केलेले आहे. जगभरातील विद्वान बाबासाहेबाच्या विद्वतेचे वर्णन करतात. त्यांच्या कार्याला शतशत नमन. भविष्यातही त्यांचे कार्य सतत आपणास प्रेरणा देत राहीलव.

**संदर्भ ग्रंथ**

१) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर, २०२३
२) आंबेडकरी चळवळीचा इतिहास, डॉ एस एस गाठाळ, कैलास प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर, २०२५
३) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, प्रा सौ सुनिता प्रदीप रंगारी, लाखे प्रकाशन, नागपूर, २०२५
४) आधुनिक महाराष्टाचा इतिहास, डॉ अनिल कठारे, विद्या बुक्स पब्लिशर, २०१८
५) महाराष्ट्रातील समाज सुधारक, अमरदीप घोटी, वर्षा पब्लिकेशन, नांदेड, २०१५
६) मुक्त मंथन, सुनंदा बोदीले, मासिक, सप्टेंबर २०२४
७) इतिहास, इ ८ वी, महाराष्ट्र बोर्ड, पुणे २०२५
८) इतिहास इ १०वी, महाराष्ट्र बोर्ड, पुणे २०२५
९) आधुनिक महाराष्टाचा इतिहास, डॉ अनिल कठारे, विद्या बुक्स पब्लिशर, २०१५
१०) आधुनिक भारताचा इतिहास, डॉ बी एल ग्रोवर, डॉ एन के. बेल्हेकर, एस चंद पब्लिकेशन, २०१०
११) www.wikipedia.com
१२) www.marathivishwkosh.com